फुले-आंबेडकरी

इतिहास प्रमेये



संपादक- गौतमीपुत्र कांबळे

प्रा. गौतमीपुत्र कांबळे

Fule-Ambedkari Itihas Prameye

Editor-Prof. Gautamiputra Kamble

प्रथम आवृत्ती,

राजा ढाले जन्मदिन - ३० सप्टेंबर २०२२

© विजया गौतमीपुत्र कांबळे

'अव्याकृत', ३३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर हौसिंग सोसायटी,
विजयनगर (पूर्व) वॉनलेसवाडी, सांगली. ४१६ ४१४
मो. ९८२२९७५४३०

प्रकाशक,

एक्स्प्रेस पब्लिशिंग हाऊस,
वैशाली स्क्वेअर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर. ४१६ ००३

मुखपृष्ठ,

धम्मेक स्तूप, सारनाथ (जेथे बुद्धाने पहिला धम्मोपदेश केला.)

मलपृष्ठ,

अशोक स्तंभ, लुम्बिनी (गौतम बुद्धाचे जन्मठिकाण.)

मांडणी,

आयु. प्रभाकर कांबळे, मुंबई
आयु. अशोक नगरे, पारनेर

मुद्रक,

भारती मुद्रणालय
८३२ ई, शाहुपुरी, ४ थी गल्ली, कोल्हापूर.

मूल्य : रुपये ४००/-

१. संपादकीय । प्रा. गौतमीपुत्र कांबळे ०१
२. स्वागत । प्राचार्य डॉ. हरिष भालेराव ०८
३. भूमिका । प्रा. गौतमीपुत्र कांबळे ११
४. मनोगत । डॉ. एम्. ए. वाहूळ १६
५. मनोगत । सा. रे. तथा आप्पासाहेब पाटील २३
६. अध्यक्षीय भाषण । कॅप्टन पी. एन. कांबळे २९
७. डॉ. आंबेडकरांची इतिहासाविषयक प्रमेये । डॉ. मा. प. थोरात ५१
८. शूद्र पूर्वी कोण होते? पुस्तकाचा परिचय । धनराज डहाट ६२
९. अस्पृश्य मुळचे कोण? पुस्तक परिचय । साहेबराव नितनवरे ७६
१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'सम्यक स्त्रीवादी' इतिहास
लेखनाचे आकलन समजून घेताना । प्रा. डॉ. सुनीता बोर्डे ८५
११. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इतिहास लेखन
पद्धतीची प्रासंगिकता । प्रा. डॉ. सुनीता सावरकर १०६
१२. क्रांतीबा फुले यांचा इतिहास विषयक दृष्टीकोन । डॉ. अशोक चौसाळकर ११३
१३. राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक समता आणि
न्यायाचे ऐतिहासिक कार्य । प्रा.डॉ.भरत नाईक १२७
१४. राजर्षी शाहू छत्रपतींचे बहुजन उध्दारक निवडक
जाहीरनामे व हुकूमनामे । प्रा.डॉ.चंद्रकांत कुरणे १३१
१५. बौद्ध धम्माचा पश्चिम दक्खन मधील प्रसार
आणि लेण्यांचा विस्तार । प्रा. डॉ. वाय्. एस्. अलोने १५२
१६. बौध्द धम्माच्या इतिहासाची पुनर्मांडणी आणि पुरातत्त्वशास्त्र
समीक्षात्मक विवेचन । प्रा. डॉ. श्रीकांत गणवीर १७१
१७. इयं धम्मलिपी । अतुल मुरलीधर भोसेकर १८०
१८. विदर्भातील नव्याने उजेडात आलेले बौद्ध अवशेष । प्रा. डॉ. प्रदीप मेश्राम १८७
१९. लोह युगीन महापाषाणिक समाधि संस्कृति का
बौद्ध संस्कृतिपर प्रभाव । प्रा. डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे १९३
२०. गुजरातमधील बौद्धधम्म । एम्. एस्. मोरे २०४
२१. कोल्हापूर : प्राचीन बौद्ध धम्माचे प्राचीन केंद्र । परमानंद घाटे २२०
२२. कोकणातील बौध्द पुरावशेष । र. रा. बोरकर २२८
२३. वडागोकूगीरीमध्ये बौध्द संस्कृती । एन्. जी. निकोशे २३५
२४. नालंदा - एक प्राचीन शिक्षण केंद्र । गोरख कांबळे २३९
२५. इतिहासाची पुनर्मांडणी झाली पाहिजे । डॉ. आ. ह. साळुंखे २४६
२६. अजिंठा भित्तिचित्रांचा ऐतिहासिक प्रवास :
सद्यस्थिती व उपाययोजना । प्राचार्य राजेंद्र ज. महाजन २५३
२७. अंजिठ्याशी नातं असणारं पिताळखोरा । प्रा. बाळासाहेब पाटील २६९
२८. सिरपूर छत्तिसगड मधील बौध्दावशेष । बबन चहांदे २७५
२९. शैलगृहे (लेणी स्थापत्य) । अशोक नगरे २७९
३०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर की पूर्णाकृती प्रतिमाओं मे
साकार उनका व्यक्ति लक्षण : ऐतिहासिक अवलोकन । प्रा. प्रमोदबाबू रामटेके २८४
३१. स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्रातील 'आंबेडकरी दृश्यकला' :
संक्षिप्त ऐतिहासिक आढावा । प्रभाकर कांबळे ३००
३२. इतिहासाचे विकृतीकरण थांबविले पाहिजे । डॉ. टी. एस्. पाटील ३०९
३३. फुले-आंबेडकरी विचारधारेतील इतिहास संशोधकःराजा ढाले । प्रा. गौतमीपुत्र कांबळे ३१५
३४. इतिहास परिषद, कोल्हापूर-मनोगत । ब्रिगेडियर एस. एम. भालेराव ३४०
३५. फुले-आंबेडकर विचारधाराप्रणीत । इतिहास परिषद, कोल्हापूर १९९६-ठराव ३४३
३६. इतिहास परिषद, कोल्हापूर-अध्यक्षीय समारोप। कॅप्टन पी. एन. कांबळे ३४४

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इतिहास लेखन पद्धतीची प्रासंगिकता

प्रा. डॉ. सुनीता सावरकर,
औरंगाबाद

प्रस्तावना

भारतीय इतिहास लेखन वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या पद्धतीने लिहिले गेले. अगदी प्राचीन काळी इतिहास हा मौखिक पद्धतीने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सुपूर्त केला जात असे. यामध्ये गुरूकुलाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मौखिक पद्धतीने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे इतिहासाचे हस्तांतरण होत असे. या परंपरेत कालांतराने काही बदल झाले. जेव्हा लिखाणाची कला अवगत झाली तेव्हा भूर्जपत्र, ताम्रपट, शीलालेख इत्यादींच्या माध्यमातून इतिहासाच्या नोंदी नोंदवल्या गेल्या. नंतरच्या कालखंडात राजेशाहीला पूरक अशा स्वरूपाचं लिखाण करण्यात आलं. त्याच बरोबर जे परकीय यात्रेकरू भारतात आले त्यांनी प्रवास वर्णने लिहिली. यामध्ये कुठेही लिखित आणि सर्वार्थाने सर्वांना सामावून घेणारा असा सामाजिक इतिहास मात्र लिहिला गेला नाही. समाजातील सर्वात शेवटच्या घटकाचा इतिहासामध्ये असणारा सहभाग नोंदवला गेला नाही. भारतीय इतिहासाला खऱ्या अर्थाने ऐतिहासिक लिखित स्वरूपामध्ये लिहिण्याची सुरुवात ब्रिटिश भारतामध्ये आल्यानंतर झाली. हे सत्य असले तरी भारतीय इतिहास लेखन हे एकांगी व कायम वर्ण वर्चस्व वादाला प्रोत्साहित करणारे आहे. इतिहास लेखनातील सर्वसामान्य माणसाच्या सहभागाला महत्त्व दिल्याचे दिसून येत नाही, कारण भारतीय समाजच मुळात विषमतेवर आधारलेला आहे. त्यामध्ये सर्वसामान्य माणसांमध्ये शूद्र, अतिशूद्र व स्त्रिया यांचा समावेश असल्यामुळे त्यांच्या विषयीचे लिखाण पारंपरिक इतिहास लेखनामध्ये येत नाही.

इतिहासामध्ये विविध इतिहास लेखनाच्या पद्धती वापरल्या गेल्या परंतु त्यामध्येही समाजाचा सर्वात शेवटचा घटक हा अंतर्भुत होतोच असं नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले इतिहास लेखन हे समाजातील सर्वात शेवटच्या घटकांच्या

ऐतिहासिक योगदानाला न्याय देणारे व त्याची दखल घेणारे आहे. याच इतिहास लेखनाच्या पद्धतीची आजची प्रासंगिकता समजून घेणे खूप महत्त्वाचे आहे. भारतीय इतिहास लेखन प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक या तीनही कालखंडामध्ये झालेले दिसून येते. प्राचीन भारतीय इतिहास लेखन मुख्यत्वेकरून धार्मिक साहित्य आहे, त्याचबरोबर मध्ययुगीन काळातील उपलब्ध असणारे साहित्य राजे-राजवाडे यांच्या इतिहासाचे साहित्य आहे. आधुनिक कालखंडामध्ये झालेलं लेखन हे परिवर्तनाच्या अनेक पैलूंचे दर्शन घडवणारे लेखन आहे. भारतीय इतिहास लेखन प्रामुख्याने राष्ट्रवादी, मार्क्सवादी, वसाहतवादी दृष्टिकोनातून झालेले आहे. वसाहतवादी दृष्टिकोन यामध्ये भारतीय समाज व्यवस्थेमध्ये उणिवा दाखवून देणारे लिखाण राहिले आहे. वसाहतवादी दृष्टिकोनाला प्रत्युत्तर म्हणून राष्ट्रवादी इतिहास लेखनाचा उदय झाला, तसेच जी काही स्थित्यंतरे घडून येतात त्या पाठीमागे आर्थिक कारण असतं हे गृहीत धरून घडलेल्या घटनेमध्ये आणि प्रत्येक परिवर्तनामध्ये आर्थिक बाजू कशी कारणीभूत आहे हे सांगणार इतिहास लेखन मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाहाने केले. इतिहासाच्या कक्षेमध्ये येणाऱ्या सर्वच घटकांना न्याय देणारी अशी कोणती इतिहास लेखन पद्धती असेल, ज्या आधारे इतिहासातील घटितांची मांडणी ही तंतोतंत सत्याच्या जवळपास जाणारी करता येईल हा मोठा प्रश्न आहे. आजपर्यंत झालेले भारतीय इतिहास लेखन धर्म, राजनिष्ठा, प्रशासन इत्यादी गोष्टींना महत्व देणारे आहे. इतिहासाच्या घटितामध्ये सर्वसामान्य माणूस हा केंद्रीभूत असतो त्यामध्ये स्त्रिया, समाजातील दबलेला शोषित समूह हा सुद्धा इतिहासाच्या घटनांचा भाग असतो. त्यांचा इतिहास घडविण्यामध्ये असणारा सहभाग, त्यांचं शोषणावर आधारित रोजच जीवन, त्यांची संस्कृती, त्यांच्या शोषणाच्या परंपरा हे सुद्धा इतिहासाचे भाग बनले पाहिजेत. अशा स्वरूपात जर सर्वंकष इतिहासाची पुनर्मांडणी करायची असेल तर आंबेडकरवादी इतिहास लेखन पद्धती उपयुक्त आहे. आधुनिक कालखंडातील सुरुवातीचे भारतीय इतिहास लेखन मुळातच पाश्चात्य इतिहासकारांना प्रत्युत्तर देणारे असल्यामुळे ते शौर्याचे गुणगाण गाणारे व राज्यकर्त्यांच्या पराक्रमांची जंत्री असणारे असे लिखाण आहे. त्यामुळे वर्ण जाती व्यवस्था आधारित समाजातील सर्वसामान्य माणूस व त्यांचं शोषण याकडे सोईस्कर दुर्लक्ष केले गेले.

अनेक इतिहास लेखनाच्या पद्धती उदयाला आल्या तरी त्यांच्या काही मर्यादा

आहेत, लिखित साधन असल्या शिवाय इतिहास लिहिता येत नाही ही सर्वात मोठी मर्यादा आहे. इतिहास हा समाजातील सर्वात शेवटच्या माणसांचासुद्धा असू शकतो. इतिहास घडत असताना जंगलात राहणारा आदिवासी समाज, व्यवस्थेने बहिष्कृत केलेले समुदाय व स्त्रिया सुद्धा इतिहासातील घटीतांचा एक भाग असतात. मग या समाजातील सर्वात शेवटच्या घटकाला इतिहासाच्या परिप्रेक्ष्यात आणण्यासाठी जी पद्धती वापरायची ती परिपूर्ण असायला हवी, ज्यामध्ये जंगलात राहणाऱ्या आदिवासींचाही अभ्यास करता येईल व शहरात, गावात राहणाऱ्या लोकांचाही अभ्यास करता येईल. इतिहास लेखनात कोणतीही संशोधन पद्धती वापरली तरी त्यासाठी पुरावे आवश्यक असतात, त्याशिवाय इतिहास लेखन शक्य होत नाही. इतिहासकार लॅंजीलॉस व सिनबॉस यांच्या मते No Documents No History म्हणजेच इतिहास हा गत काळातील घटनांचा असल्यामुळे भूतकाळाविषयी माहिती देणारे लिखित संदर्भ साधने असली पाहिजेत. तरच तो इतिहास लिहिता येतो. (सरदेसाई, १९९०: १२) समाजात शिक्षित व राज्यकर्ते तसेच वर्चस्व असणाऱ्या सामाजिक घटकांबाबत लिखित संदर्भ साधने उपलब्ध होतात; त्या पलीकडच्या शोषित, अशिक्षित व समाजाचा सर्वात शेवटचा भाग असणारे शूद्र, अस्पृश्य, आदिवासी, भटके व स्त्रिया इत्यादींचा इतिहासात समावेश व्हावा यासाठी त्यांच्या कर्तृत्वाचा आलेख त्यांच्या शोषणाच्या परंपरा, सामाजिक संबंध त्यांचे सांस्कृतिक जीवन, यांना लिखित पुराव्याअभावी कोणत्या इतिहास लेखन पद्धतीने शब्दबद्ध करावे? हा महत्त्वाचा विषय होता.ही कोंडी आंबेडकरवादी इतिहास लेखन पध्दतीने फोडली. 'प्रोफेसर कसा असावा' या विषयी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी 'नवयुग'च्या १९४७ च्या अंकात आपले संशोधना विषयीचे विचार मांडले आहेत. संशोधन कसं करावं? या विषयी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी एकदा प्रो. सेलिग्मन यांना विचारले असता ते म्हणाले 'तू आपलं वाचनाचं काम चालू ठेव, म्हणजे तुला आपोआप समजूं लागेल संशोधन कसं करावं' पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'त्याप्रमाणे मी स्वत:च विचार करू लागलो, खूप वाचन सुरू ठेवले आणि त्यामुळे मला स्वत:च्या पायावर उभे राहून स्वत:लाच मार्गदर्शन कसे करता येते,याचा चांगलाच धडा मिळाला.' (नवयुग, आंबेडकर विशेषांक १३ एप्रिल १९४७ पृ ३३ व ३४) याचाच अर्थ हा आहे की, संशोधन कसं करावं? हा प्रश्न त्यांनी स्वता:च सोडवला होता. संशोधनाची पध्दती ही स्वत:च विकसित केली होती व त्याधारे शूद्रांच्या, अस्पृश्यांच्या लिखाणाची सुरुवात ही शास्त्रशुद्ध स्वरूपात डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांनी केली, त्यांची ग्रंथ संपदा पुढील प्रमाणे.

१) कास्ट इन इंडिया (१९१७)
२) इव्हॅल्युएशन ऑफ प्रोविन्शियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया (१९२३)
३) प्रॉब्लेम ऑफ रुपी, इटस् ओरीजीन अॅड ईटस् सोल्युशन (१९२३)
४) हिस्ट्री ऑफ इंडियन करन्सी अॅड बँकिंग (१९२३)
५) अॅनहिलेशन ऑफ कास्ट (१९३७)
६) फेडरेशन वर्सेस फ्रिडम (१९४०)
७) थॉट्स ऑन पाकिस्तान (१९४०)
८) गांधी अँड इमॅनिसिपेशन ऑफ अनटचेबल्स् (१९४३)
९) रानडे, गांधी अँड जिना (१९४३)
१०) राईज अॅड फॉल ऑफ हिंदु वुमन
११) कम्युनल डेडलॉक अॅड हाऊ टू सॉल्व इट (१९४५)
१२) व्हॉट कॉंग्रेस अँड गांधी हॅव डन टू द अनटचेबल्स् (१९४६)
१३) हु वेअर द शुद्रास (१९४६)
१४) पाकिस्तान ऑर पर्टिशन ऑफ इंडिया (१९४६)
१५) स्टेट अँड मायनॉरिटीज् (१९४७)
१६) महाराष्ट्र हॅज लिंग्विस्टिक प्रोव्हिजन (१९४८)
१७) अनटचेबल्स् (१९४८)
१८) थॉटस् ऑन लिंग्विस्टिक स्टेट्स (१९५५)
१९) बुद्धा अँड हिज धम्मा
२०) रिडल्स इन हिंदुइझम
२१) रायटींग एन्ड स्पीचेस ऑफ डॉ. आंबेडकर भाग १४ (सिंगारे,२०००:९७)

सदरील ग्रंथ संपदेची यादी बघता यातील काही ग्रंथ हे प्राचीन भारतीय इतिहास लेखनाची व काही ग्रंथ हे समकालीन इतिहास लेखनासंबंधी आहेत.

या सर्व ग्रंथांमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले सिद्धांत व त्यासाठी वापरलेली साधने यांचा उपयोग करून ऐतिहासिक लिखाणात ज्या जागा रिकाम्या आहेत, ज्या कालखंडाचा इतिहास लिहायचा राहिला आहे, तो इतिहास लिहिण्यासाठी आंबेडकरवादी इतिहास लेखनपद्धती वापरण्याची गरज आहे. डॉ.

बाबासाहेब आंबेडकर यांनी शूद्र, अस्पृश्य व स्त्रियांच्या इतिहासाची मांडणी केली ती त्यांच्या हु वेअर द शूद्राज,दि अनटचेबलस् व राईज अॅड फॉल्स ऑफ हिंदू विमेन इ. ग्रंथांच्या माध्यमातून आपली एक वेगळी संशोधन पद्धती विकसित केली. ज्यांच्या इतिहासाचे लिखित पुरावे नाहीत त्यांचासुद्धा इतिहास लिहू शकतो, हे त्यांनी दाखवून दिले व 'नो डॉक्युमेंट्स नो हिस्टरी' लॅजीलॉस व सिनबॉस यांचा इतिहासाविषयीचा मांडलेला सिद्धांत खोडून काढला. पारंपरिक इतिहास लेखन पध्दती नाकारत डॉ. बाबासाहेब आंबेडकर असं म्हणतात, 'ऐतिहासिक घडामोडींच्या निष्कर्षावर नियंत्रण ठेवणारा असा एखादा नियम असेल व तो प्रत्यक्ष घटनेचा पुरावा पाहिल्याशिवाय बाकी कशाचाच स्वीकार करावयास तयार नसेल तर तो नियमच दुष्ट आहे' (आंबेडकर,२०१३:१०) याचाच अर्थ असा आहे की, जर लिखित कागदपत्रांचा संदर्भ नसेल तर तो इतिहास होऊ शकत नाही, हा नियम एका विशिष्ट स्तरातील लोकांनाच न्याय देतो. तो सर्वांचा इतिहास लिहिण्यासाठी उपयुक्त नाही. ज्यांची लिखित संदर्भ साधनं नाहीत त्यांचाही इतिहास असतो व तो लिहिण्यासाठी काय करावे या विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात 'गृहीत पक्ष सभोवतालच्या घटनांशी सुसंगत असावा त्या घटनांचे स्पष्टीकरण त्यात असावे आणि त्यांचा त्याने अन्वयार्थ लावावा' (आंबेडकर,२०१३:१२) म्हणजेच आपल्याला जे मांडायचे आहे ते सभोवतालच्या घटनांशी सुसंगत असावे, त्या घटनांचे स्पष्टीकरण असावे व त्यानंतर त्याचा अन्वयार्थ लाऊन आपल्याला जी मांडणी करायची आहे ती करावी. ही सर्व मांडणी सिद्धांताच्या रूपात झाल्यानंतर त्याचे परीक्षण कसे करायचे याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'हा सिद्धांत विशुद्ध अनुमानावर आधारलेला आहे की नाही आणि हा सिद्धांत शक्य कोटीतील आहे की नाही' (आंबेडकर,२०१३:१०) या दोन मुद्यांच्या आधारे लावलेला अन्वयार्थ तपासून घेतला जाऊ शकतो. शूद्र, अस्पृश्य, आदिवासी, भटके-विमुक्त, स्त्रिया हे सर्व समाजातील असे घटक आहेत जे कायम शोषित व वंचित राहिले, त्यामुळे त्यांच्या इतिहासाची लिखित साधने मिळणे शक्य नाही अशा वेळी त्यांच्या इतिहासाचे संदर्भ हे त्यांच्या आजूबाजूच्या कथा, गाणी, म्हणी, शिव्या व प्राचीन पुरातत्वीय पुरावे आणि त्रोटक स्वरूपात शासकांच्या लिखित पुराव्यांमध्ये असणारे संदर्भ या आधारावर शोषितांच्या इतिहासाची मांडणी करता येते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील शूद्र, अस्पृश्य, भटके, आदिवासी,

स्त्रीया यांची हजारो वर्षांपासूनची कोंडी फोडली,त्यांना त्यांच्या सांस्कृतिक गुलामगिरीच्या बंधनातून मुक्त केले व माणूस म्हणून मुक्तपणे विकसित होण्यासाठीचे हक्क मिळवून दिले. हे जसं सत्य आहे तसंच हेही सत्य आहे की,हजारो वर्षांची शोषणाची परंपरा, सामर्थ्यवान पूर्वजांना जनावरा पेक्षाही खालच्या दर्जाच्या मिळालेल्या वागणुकीला पहिल्यांदा इतिहासाच्या कक्षेत आणून इतिहास लेखनातील कोंडी सुध्दा फोडली. खऱ्या अर्थाने शोषितांना, गुलामांना ज्यावेळी इतिहास लेखनात स्थान मिळते तो काळ इतिहास लेखनाचा आधुनिक काळ होय.

इतिहासाची पुनर्मांडणी होणे गरजेचे आहे. भारतीय इतिहास लिखाणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले सिद्धांत महत्त्वाचे आहेत. उदाहरणार्थ, अस्पृश्यांच्या मूळ अवस्थेचा शोध घेणारा नावीन्यपूर्ण सिद्धांत, जातिव्यवस्थेच्या उगमाचा शोध घेणारा वादळी सिद्धांत, महिलांच्या उन्नती आणि अवनती विषयी मांडलेला सिद्धांत हे सर्व इतिहासाशी संबंधित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वर्ण, जात, धर्म, पितृसत्ता या गोष्टींना पायाभूत मानून इतिहासाचे सिध्दांतन केलेले दिसून येते. भारतामध्ये वर्ण व जात या शोषण संस्था म्हणून कार्यरत राहिलेल्या आहेत. इतिहासाच्या वेगवेगळ्या कालखंडात या शोषण संस्थांना विरोध करणाऱ्या परंपरा आढळतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय इतिहासाचे विश्लेषण करताना प्रतिपादन केलेले आहे की, भारताचा इतिहास हा राजघराण्यातील संघर्षाचा इतिहास नसून वरिष्ठ जाती व कनिष्ठ जाती यांच्यातील संघर्षाचा म्हणजे जाती संघर्षाचा इतिहास आहे. भारतीय इतिहासाच्या विविध कालखंडामध्ये जातिव्यवस्थेला विरोध करणाऱ्या परंपरा व जातीव्यवस्था टिकवून ठेवणाऱ्या परंपरा असा संघर्ष सतत राहिलेला आहे. (गायकवाड,२०१७:१९) भारतीय इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात शोषक व शोषित यांच्यात कायम संघर्ष झालेला आहे. त्याला जातीव्यवस्था कारणीभूत आहे; हा सिद्धांत घेऊन अगदी आजतागायतचे इतिहासाचे लिखाण होऊ शकते, आणि आदिवासी, शूद्र, अतिशूद्र व स्त्रिया यांच्या पडद्याआड असलेल्या इतिहासाची पुनर्मांडणी होऊ शकते.

मध्ययुगीन भारताचा इतिहास लेखनाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात; शोषण करणाऱ्या संस्थेला विरोध हा धार्मिक प्रांगणातून झालेला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय इतिहासाच्या विश्लेषणाचे हे तत्त्व तेराव्या शतकातील जातिव्यवस्था सरंजामशाहीच्या काळात उदयाला आलेल्या भक्ती चळवळीच्या आंदोलनामध्ये विविध धर्म पंथ यांनी जाती वर्णव्यवस्थेला केलेला विरोध समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरते. म्हणून या आंदोलनामध्ये जाती-व्यवस्थेला धक्का देणारे संघर्ष धर्माच्या परिघात उभे राहिले तसेच भारतातील जातीवरून व्यवस्थेला विरोध करणाऱ्या धर्म चळवळींना धर्म चळवळींच्या जाती विरोधी तत्त्वज्ञानाचा व स्त्री-पुरुष समानतेविषयी घेतलेल्या भूमिकेचा वेध घेण्याचा प्रयत्न करतांना आंबेडकरांनी मांडलेले सूत्र केंद्रस्थानी मानून विश्लेषण केल्यास सत्याच्या अधिक जवळ जाता येते.' (गायकवाड, २०१७:२०) यावरून हे निश्चितच सिद्ध होते की, भारतीय इतिहास लेखनामध्ये ज्या ज्या कालखंडातील इतिहासाचे लिखाण अजून व्हायचे आहे, तसेच ज्यांच्या विषयीचे इतिहासलेखन लिहायचे आहे, त्या सर्वांना जर इतिहासाच्या कक्षेमध्ये आणायचे असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इतिहास संशोधनात वापरलेले सिद्धांत जात, वर्ण व पितृसत्तेची चौकट आणि इतिहास लेखनात वापरावयाचे साधने, तसेच ज्यांच्या कार्यकर्तृत्वाचे लिखित कोणतेही पुरावे नाहीत, अशा वेळेस करावयाचे तर्क आणि कार्यकारणभाव याचा उपयोग इतिहास लिखाणामध्ये नवनवीन सत्यांना समोर आणण्यास उपयुक्त आहे. त्यामुळे इतिहासामध्ये जास्तीत जास्त सत्याच्या जवळ जाण्यासाठी, त्याला सर्वांगाने विकसित करण्यासाठी इतिहासाची पुनर्मांडणी होणे गरजेचे आहे. ते निश्चितच आंबेडकरवादी इतिहास लेखनपद्धतीमुळे साधता येईल असा विश्वास वाटतो.

संदर्भ ग्रंथ -

१) आंबेडकर बी. आर, (२०१३) : अस्पृश्य मूळचे कोण?,(मराठी अनुवाद), आनंद प्रकाशन, औरंगाबाद

२) सरदेसाई व इतर, (संपा.)(१९९०), इतिहास लेखनशास्त्र, फडके बुक सेलर्स, कोल्हापूर.

३) आंबेडकर बी. आर.(१९४७) : नवयुग, आंबेडकर विशेषांक, पुनर्प्रकाशन विनीमय पब्लिकेशन, मुंबई.

४) गायकवाड पुष्पा (२०१७) : भक्ती पंथाचा जातीविद्रोह व स्त्रीमुक्तीच्या प्रेरणा आंबेडकरवादी परिदृष्टीने आकलन, हरिती पब्लिकेशन्स, पुणे.

५) सिंगारे अनिल (२०००) : इतिहासकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, निर्मल प्रकाशन, नांदेड.

देवानं पियेनं पियदसिन लाजिन विसतिवसाभिसितेन
अतनआगाच महीयिते हिदबुधजाते सक्यमुनीति
सिलाविगडभिचा कालापित सिलाठभेच उसपापिते
हिदभगवंजातेति लुमिनिगामे उबलिकेकटे
अठभागियेच

...

देवांना प्रिय प्रियदर्शी राजाने आपल्या राज्याभिषेकाच्या विसाव्या वर्षी येथे भेट दिली. इथे शाक्यमुनि बुद्धाचा जन्म झाला आहे. त्यामुळे या ठिकाणी शिलास्तंभ रोवून ही माहिती सर्वजणांना व्हावी, म्हणून शिलालेख लिहिला आहे. या ठिकाणी भगवंताचा जन्म झाला असल्याने 'लुंबिनीग्राम' राजाला मिळणाऱ्या आठव्या करांपासून करमुक्त केले आहे.